**प्रेस नोट** दिनांक ०१/०९/२०२६.

## पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-३, मुंबई अधिनस्त पोलीस ठाण्यांमधील सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई – १० सराईत गुन्हेगारांना ०१ वर्षासाठी हद्दपार

मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणे तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करणे, हा मुंबई पोलीसांचा सर्वोच्च प्राधान्याचा विषय असून त्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त, मुंबई, मा. पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), मुंबई तसेच मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-३, मुंबई यांच्या अधिनस्त पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्हेगारी पूर्वइतिहास असलेल्या सराईत गुन्हेगारांचा सखोल आढावा घेण्यात आला. त्यामध्ये परिसरात सातत्याने दहशतीचे वातावरण निर्माण करणारे, घातक शस्त्रांचा धाक दाखवून नागरिकांना व व्यावसायिकांना धमकावणारे, मारहाण, शिवीगाळ, हप्तेवसुली, खंडणी, जबरी चोरी, घातक शस्त्रांच्या धाकाने पैसे उकळणे, अंमली पदार्थ विक्री करणारे तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणारे आणि गंभीर स्वरूपाचे दखलपात्र गुन्हे वारंवार करणारे एकूण १० सराईत गुन्हेगार आढळून आले.

सदर गुन्हेगारांच्या सातत्यपूर्ण गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील सर्वसामान्य नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी व व्यावसायिक यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक नागरिक हे त्यांच्या दहशतीमुळे तक्रार देण्यासही धजावत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अशा प्रवृत्तीच्या गुन्हेगारांविरुद्ध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक होते.

त्या अनुषंगाने संबंधित पोलीस ठाण्यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदीनुसार हद्दपारीचे प्रस्ताव सादर केले. त्यानुसार सुनावणीची संपूर्ण कायदेशीर सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर संबंधित १० सराईत गुन्हेगारांना मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्याच्या हद्दीतून ०१ (एक) वर्षाच्या कालावधीसाठी हद्दपार (Externment) करण्यात आले आहे.

**हद्दपार करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगारांची माहिती** :-

### कलम ५६(१)(अ)(ब) महाराष्ट्र पोलीस कायदा

| अ.क्र. | पोलीस ठाणे | हद्दपार इसमाचे नाव व पत्ता | हद्दपार दिनांक | फोटो |
|---|---|---|---|---|
| १ | आरे | **अमन पुत्तन जयस्वाल, वय ३८ वर्षे,** रा.ठि. युनिट क्र. ३०, मोराचा पाडा, आरे कॉलनी, गोरेगाव (पुर्व), मुंबई | २२/०८/२०२६ |  |
| २ | आरे | **प्रफ्फुल युवराज आवाडे, वय ३७ वर्षे,** रा.ठि. पंचशिल वेल्फअर सोसायटी, पाण्याच्या टाकी जवळ, युनिट क्र. ३१, आरे कॉलनी, गोरेगाव(पुर्व), मुंबई | २२/०८/२०२६ |  |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | कुरार | **अभिषेक महेंद्रप्रसाद सरोज उर्फ बचकाना भाई, वय २४ वर्षे**<br>रा.ठि. गोविंद सेठ चाळ, कटींग नं. ५, श्रीरामनगर तानाजी नगर, कुरारगाव, मालाड (पुर्व), मुंबई | १२/०८/२०२६ |  |
| ४ | कुरार | **पंकज मारुती चाळके, वय ३७ वर्षे,**<br>रा.ठि. साईचाळ कमिटी, चाळ नं. १, रुम नं.९५, धोबीघाट, तानाजीनगर, कुरारगांव, मालाड (पुर्व), मुंबई | २८/०८/२०२६ |  |
| ५ | कुरार | **महेश शिवराज स्वामी, वय २४ वर्षे,**<br>रा.ठि. रुम नं. २, साईचाळ कमिटी, धोबीघाट , तानाजीनगर, कुरारगांव, मालाड (पुर्व), मुंबई | २८/०८/२०२६ |  |
| ६ | समतानगर | **ऋषिकेश विकास हरमाळे उर्फ बुटक्या, वय २७ वर्षे,**<br>रा.ठि. टांगेवाली चाळ, शंकर मंदिराजवळ, नरसीपाडा, कांदिवली (पुर्व), मुंबई. | २६/०८/२०२६ |  |
| ७ | कस्तुरबा मार्ग | **विजय हरिश्चंद्र भोईर, वय २४ वर्षे,**<br>रा.ठि. राजनीपाडा, आदिवासी गावठाण, संजय गांधी उद्यान, बोरीवली (पूर्व) मुंबई. | २४/०८/२०२६ |  |
| ८ | वनराई | **राणी रघुनाथ हरीजन, वय ५६ वर्षे,**<br>रा.ठि. रुम.न.१०३, जयअंबे वेल्फेअर सोसायटी गल्लीमध्ये, आंबेडकर नगर, सोनावाला रोड, गोरेगाव(पुर्व) मुंबई.<br>२) रुम.न.३०४, स्टेन रिऐल्टर्स, एम.एम.आर. डी.ए डी मार्ट रोड, महानगर पालीका वॉर्ड ऑफिस जवळ, भाईंदर पश्चिम जि.ठाणे. | २५/०८/२०२६ | -- |

## कलम-५५ महाराष्ट्र पोलीस कायदा

| अ.क्र. | पोलीस ठाणे | हद्दपार इसमाचे नाव व पत्ता | हद्दपार दिनांक | फोटो |
|---|---|---|---|---|
| १ | कुरार | **कार्तिक उर्फ कार्तिकेय दिनेशकुमार पाठक, वय २३ वर्षे**<br>रा.ठि. मारुती सेवासंघ चाळ, रिक्षा स्टॉप जवळ, कुरारगांव, मालाड(पुर्व), मुंबई. (टोळी प्रमुख) | २२/०८/२०२६ |  |
| २ | कुरार | **शैलेश अनिलकुमार गिरी, २१ वर्षे ,**<br>रा.ठि. मारुती सेवासंघ चाळ, रिक्षा स्टॉप जवळ, कुरारगांव, मालाड (पुर्व), मुंबई | २२/०८/२०२६ |  |

मुंबई पोलीसांकडून करण्यात आलेली ही कारवाई गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रभावी प्रतिबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून, संघटित गुन्हेगारी, दादागिरी, हप्तेवसुली, खंडणी, शस्त्रांच्या धाकाने नागरिकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींवर आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे. अशा प्रतिबंधात्मक कारवायांमुळे कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होणार असून, नागरिकांना सुरक्षित, शांततापूर्ण व निर्भय वातावरण उपलब्ध करून देण्याच्या मुंबई पोलीसांच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळणार आहे.

पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-३, मुंबई यांच्या अधिनस्त सर्व पोलीस ठाण्यांना हद्दपार आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली असून वर नमूद इसमांना हद्दपार आदेश तामील करण्यात आलेले आहेत. हद्दपार करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती आदेशाचे उल्लंघन करून मुंबई शहर अथवा मुंबई उपनगर जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश करताना अथवा वास्तव्यास असल्याचे आढळून आल्यास तिच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित तरतुदीनुसार तात्काळ व कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मुंबई पोलीस नागरिकांना आवाहन करीत आहेत की, आपल्या परिसरात कोणताही हद्दपार गुन्हेगार अथवा संशयित व्यक्ती वावरत असल्याची माहिती मिळाल्यास ती तात्काळ संबंधित पोलीस ठाण्यास किंवा मुंबई पोलीस आपत्कालीन क्रमांक १०० / ११२ वर कळवावी. माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.

'सुरक्षित मुंबई, निर्भय नागरिक' हे ध्येय साध्य करण्यासाठी मुंबई पोलीस अशा प्रकारच्या प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाया भविष्यातही अधिक प्रभावीपणे व सातत्याने राबवत राहतील.

...................